# 'सागर तरंग' कवितासंग्रहाचे शिवाजी विद्यापीठात प्रकाशन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागाचा विद्यार्थी सागर बारटक्के याच्या 'सागर तरंग' कविता संग्रहाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते प्रकाशन झाले. कवयित्री मंजुश्री गोखले प्रमुख पाहुण्या, तर रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. जी. एस. गोकावी अध्यक्षस्थानी होते. डॉ. शिंदे यांनी आईवर, प्रेमावर कविता अनेक जन करतात. पण वडिलांवर, शेतकऱ्यांवर असणाऱ्या सागरच्या कविता वास्तवावर बोट ठेवणाऱ्या असल्याचे सांगितले. कवयित्री गोखले यांनी सागर नवोदित कवी असून, त्याच्या कविता मुरलेल्या कवीला तोड देणाऱ्या असल्याचे स्पष्ट केले. सागर सातारा येथील असून डॉ.आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनच्या कमवा व शिका योजनेतून शिकत आहे. मालती बारटक्के, शीतल बोधे, प्रा.डॉ. रणधीर शिंदे, प्रा. डॉ. नंदकुमार मोरे, प्रा. डॉ. संभाजी शिंदे, प्रा. डॉ. मानसिंग निंबाळकर, प्रा. डॉ. प्रशांत अनभुले, प्रा. डॉ. जी. एस. राशिनकर, एन. जे. वळेकर, प्रा.अनिल घुले, डॉ. गोफणे उपस्थित होते. योगेश भुसनर व स्नेहा भंडारे यांनी मनोगत व्यक्त केले. मालोजी माने याने प्रास्ताविक केले. महेश शिंदे याने सूत्रसंचालन केले.